[विशेष–ध. आ. (मुं. सा. वि.) ५०-म.

№ 042890

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक : महा. 1059 /2011/पुणे.
दि. 14/ 6 /11/पुणे.

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, ज्ञानदिप शिक्षण संस्था, गट नं. 23, मि. नं. ४०९, मु. पो. कासार आंबोली, ता. मुळशी, जि. पुणे.

[illegible] तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली. अर्जदार – श्री. कृष्णा पोपटराव भिलारे.

तारीख : 14/6/11 २० रोजी माझ्या सहीनिशी दिले.

Asstt. Registrar of Society
Pune Region, Pune

14/6/11

संस्थांचे सहायक निबंधक,
सहायक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे विभाग.

Inq No:- 1351/11
Mah No:- 1059/11

[विशेष–ध.अ./मुं.सा.वि./२म

071

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम २९) या अन्वये पुणे विभाग, पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव : ज्ञानदीप शिक्षण संस्था

गट नं - 23, मिळकत नं - ८०९, मु.पो - कासारआंबोली ता. मुळशी जि - पुणे

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक F- 28683 [पुणे]

कृष्णा पोपटराव भिलारे यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 29.8.11 ~~१९९~~ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

Asstt. Charity Commissioner * Pune *

सही
Asstt. Charity Commissioner
Pune Region, Pune
पदनाम

अर्ज क्र. 2331/11 कलम
अर्जदाराचे नांव :- ज्ञानदिप मिलोटे
नक्कलेचा अर्ज आला तो दिनांक:-
नक्कल तयार दि.:- 9-9-11
नक्कल दिली तो दि.:-

(५)

# * परिशिष्ट * अ *

प्रति,

मा. सहाय्यक संस्था निबंधक,

विभाग पुणे,

विषय :- **संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी बाबत.**

संस्थेचे नांव :- " ज्ञानदिप शिक्षण संस्था "

, गट नं. २३, मु.पो. कासार आंबोली,

ता. मुळशी, जि. पुणे.

महोदय,

निवेदन करण्यात येते की, विषयात नमूद केलेल्या संस्थेची नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे करावयाची आहे. सबब आपणाकडे खालील प्रमाणे कागदपत्र सादर करण्यात येत आहेत.

१. विधानपत्र (ज्ञापन) ( मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन )
२. नियम व नियमावली सत्य प्रत
३. संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाचे सर्व सभासदांची संमतीपत्र.
४. संस्था नोंदणी बाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहीनीशी अधिकारपत्र
५. संस्थेच्या पत्त्याबाबत व मालमत्तेबाबत अध्यक्ष यांचे प्रतिज्ञापत्र.
६. रूपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर .

पुढे असेही निवेदन करण्यात येते की, वरील सर्व उद्देश सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम २० क अन्वये असून वरील संस्थेची नावाची वा नाम सदृश्य असलेली अन्य संस्था माझे माहितीप्रमाणे अस्तित्वात नाही. नोंदणी शुल्क रूपये ५०/- ( रूपये पन्नास फक्त) भरण्यास आम्ही तयार आहे. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

कळावे,

सहपत्रे :-

आपला,

(६)

# * परिशिष्ट * ब *

## '' ज्ञानदिप शिक्षण संस्था ''

१) संस्थेचे नांव :- सदर संस्थेचे नांव '' ज्ञानदिप शिक्षण संस्था '' असे राहिल व याच नावाने संबोधले जाईल.

२) संस्थेचा पत्ता :- सदर संस्थेचा कार्यालयीन पत्रव्यवहाराचा पत्ता पुढील प्रमाणे राहिल.

श्री. कृष्णा पोपटराव भिलारे
गट नं. २३, मु.पो. कासार आंबोली,
ता. मुळशी, जि. पुणे.

३) संस्थेचे उद्देश :-

१. समाजातील सर्व वर्गातील मुले / मुली, महिला,पुरूष, विद्यार्थी, विद्यार्थीनी यांना शैक्षणिक दृष्टया पात्र करणे व व स्वावलंबी बनविणे.

२. सर्व शैक्षणिक विकासासाठी बालविकास बालकमंदिर, पाळणाघर, बाल मार्गदर्शन केंद्र, अंगणवाडी, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, पदवी व पदव्युतर शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू करणे. आश्रमशाळा, पॅरामेडीकल, मेडीकल, व्यवस्थापनशास्त्र, आर्युवेदीक नर्सरी चालु करणे.

३.शैक्षणिक :- कार्यक्षेत्रातील लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून देणे, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या व शालेपयोगी साहित्याचे वाटप करणे, कार्यक्षेत्रात ग्रंथालय, वाचनालय अभ्यासिकावर्ग सुरू करणे, सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्था सुरू करणे, दत्तक पालक योजना सुरू करणे.

४. वैद्यकीय :- कार्यक्षेत्रातील आजारी व गरीब लोकांना वैद्यकीय सोयी व सुविधा पासुन वंचित राहू नये यासाठी विविध आरोग्य शिबीरांचे आयोजन करणे उदा. रक्तदान, विविध चिकत्सा शिबीर इ. कार्यक्षेत्रात फिरता दवाखाना, प्रथमोपचार केंद्र सुरु करणे शक्य असल्यास संस्थेतर्फे रूग्णवाहिका सुरू करणे, असाध्य रोगाच्या उपचाराकरीता शक्य ती सर्व वैद्यकिय व आर्थिक मदत करणे.

५. क्रिडा विषयक :- मैदानी खेळांच्या प्रसार व प्रचाराकरीता तसेच तरूणांमध्ये खेळाची आवड निर्माण होण्यासाठी तसेच त्यांना शारीरीक तंदुरूस्तीचे महत्व पटवून देण्यासाठी विविध खेळांचे प्रशिक्षण वर्ग सुरू करणे, राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळाडू निर्माण करणे, विविध स्तरांवर क्रिडास्पर्धांचे आयोजन करणे, अत्याधुनिक व्यायामसाहित्यांनी सुसज्ज अशी व्यायामशाळा सुरु करणे, हेल्थकल्ब सुरू करणे, आसन, योगासन, प्राणायाम वर्ग सुरू करणे.

६. उद्योग विषयक :-- तरूणांमध्ये उद्योजक प्रवृत्ती वाढावी यासाठी प्रयत्न करणे, त्याकरीता तरूण व तरूणींना खाजगी उद्योजकांनी आखलेल्या उपक्रमात सहभागी होणे, नामांकीत उद्योगपतींच्या मार्गदर्शनाचा लाभ संबधितांना मिळवून देण्यासाठी विविध व्यवसाय व्याख्यानमालांचे आयोजन करणे, त्यांना वेगवेगळया व्यवसायांचे प्रशिक्षण देणे.

७. राष्ट्रीय उत्सव निरनिराळे राष्ट्रीय उत्सव साजरे करणे उदा. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, महाराष्ट्र दिन तसेच थोर व सामाजिक पुढा-यांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, त्याच्या तत्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे, सार्वजनिक उत्सव साजरा करणे व संस्कारवर्ग सुरू करणे.

श्री.कृष्णा पोपटराव भिलारे | श्री.कुणाल कृष्णा भिलारे | सौ. संगीता कृष्णा भिलारे

८. सामाजिक व विधायक :-- हुंडाबंदी, दारूबंदी व्यसनमुक्ती आदोंलन, अंधश्रध्दा निमुर्लन, लोकसंख्या, एडस बाबत जनजागरण करणे, साक्षरता प्रसार व मोहिम, प्रौढ शिक्षण वर्ग, सामुहिक विवाह, वधुवरमेळावे, आदर्श गांव योजना, स्वच्छता मोहिम, श्रमदान असे उपक्रम माहिती देणे व समाजप्रबोधनाचे कार्य हाती घेणे.

९. महिलांना स्वावलंबनाची जाणीव करून देणे, मार्गदर्शन करणे, त्यांना उदयोग धंदयाविषयी माहिती देणे.तरूणांना उद्योजक प्रवृत्ती वाढावी यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करणे.

४) संस्थेच्या नियम व नियमावली प्रमाणे ज्यांचेवर संस्थेची व्यवस्थापनेची जबाबदारी विहित केली आहे. अशा पहिल्या कार्यकारी मंडळातील सभासदांची नांवे, पत्ते, संस्थेतील पद वगैरे माहिती ,खालील दिले प्रमाणे.

| अ.क्र. सभासदाचे नांव व पत्ता | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व | पद |
|---|---|---|---|---|
| १.श्री.कृष्णा पोपटराव भिलारे<br>५, वसंत संध्या, उजवी भुसारी कॅालनी,<br>पौडरोड, कोथरूड, पुणे - ४११० ३८. | ४५ | व्यापार | भारतीय | अध्यक्ष |
| २.श्री.कुणाल कृष्णा भिलारे<br>५, वसंत संध्या, उजवी भुसारी कॅालनी,<br>पौडरोड, कोथरूड, पुणे - ४११० ३८. | २१ | शिक्षण | भारतीय | उपाध्यक्ष |
| ३.सौ. संगीता कृष्णा भिलारे<br>५, वसंत संध्या, उजवी भुसारी कॅालनी,<br>पौडरोड, कोथरूड, पुणे - ४११० ३८. | ३८ | गृहिणी | भारतीय | सेक्रेटरी |
| ४.श्री. संजय नारायण गोडसे<br>स.नं. ४६, दिघीगांव,<br>पुणे आळंदीरोड, पुणे - ४११० १५. | ४५ | नोकरी | भारतीय | खजिनदार |
| ५.श्री.शिवाजीराव कोंडीबा बुचडे<br>मु.पो. मारूंजी, ता. मुळशी,<br>जि. पुणे . | ३२ | व्यापार | भारतीय | सभासद |
| ६.श्री. रवी सोमाजी मांडेकर<br>एच ३२, एन.सी.एल कॅालनी,<br>पाषाण, पुणे - ४११० ०८. | ३६ | व्यापार | भारतीय | सभासद |
| ७.श्री.बाळासाहेब लक्ष्मण जगताप<br>एच ३१, एन.सी.एल कॅालनी,<br>पाषाण, पुणे - ४११० ०८. | ५० | नोकरी | भारतीय | सभासद |

श्री.कृष्णा पोपटराव भिलारे    श्री.कुणाल कृष्णा भिलारे    सौ. संगीता कृष्णा भिलारे

Deputy Charity Commissioner
Pune

// ६ //

आम्ही खालील सहया करणार " ज्ञानदिप शिक्षण संस्था " या संस्थेचे सदस्य जाहिर करतो की,संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन " ज्ञानदिप शिक्षण संस्था " आज दिनांक ७/४/२०११ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० क्र. अन्वयेनोंदणी करणेसाठी आन्ही या ज्ञापनावर सहया करीत आहोत.

| अ.क्र. | सभासदाचे नांव | सही |
|---|---|---|
| १. | श्री.कृष्णा पोपटराव भिलारे | |
| २. | श्री.कुणाल कृष्णा भिलारे | |
| ३. | सौ. संगीता कृष्णा भिलारे | |
| ४. | श्री. संजय नारायण गोडसे | |
| ५. | श्री.शिवाजीराव कोंडीबा बुचडे | |
| ६. | श्री. रवी सोमाजी मांडेकर | |
| ७. | श्री.बाळासाहेब लक्ष्मण जगताप | |

स्थळ :- पुणे
दिनांक :- २८/४/२०११

वरील सर्व इसमांना मी ओळखत असून त्यांनी माझ्या समक्ष सहया केल्या व त्या मी ओळखतो.

## ✽ प्रतिज्ञापत्र ✽

असे प्रमाणपत्र देण्यात येते की, आमचे उत्तम माहितीप्रमाणे " ज्ञानदिप शिक्षण संस्था " या नावाची संस्था अथवा नावात साम्य असणारी दुसरी संस्था या शहरात / गावात १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमानुसार नोंदणी झालेली व अस्तित्वात नाही.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |
|---|---|---|
| श्री.कृष्णा पोपटराव भिलारे | श्री.कुणाल कृष्णा भिलारे | सौ. संगीता कृष्णा भिलारे |

(८)

Deputy Charity Commissioner Pune

# * परिशिष्ट * क

## " ज्ञानदिप शिक्षण संस्था "

## :- नियम व नियमावली -:

१) नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :-

अ. संस्था :- संस्था म्हणजे मुं.सा.वि.व्य. महाराष्ट्र १८६० अन्वये नोंदविण्यात येणारी संस्था. तसेच संस्थेचा

ब. नियम :- संस्था नोंदणी अधिनियम मुं.सा.वि.व्य. महाराष्ट्र १८६० कायदे व संस्था नोंदविण्यात येताना कार्यकारी मंडळाने तयार केलेले नियम व नियमावली.

क. कार्यकारी मंडळ :- संस्थेचे कार्यकारी मंडळ म्हणजे संस्थेच्या नियम व नियमावलीनुसार संस्था स्थापनेच्या वेळी व नंतर संस्थेच्या सर्वसाधारण सभेत निवडून येणारे मंडळ किंवा विश्वस्त की, ज्यांचेवर संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपविली असे मंडळ अशा कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार, व सभासद आवश्यक असल्यास इतर पदे प्रामुख्याने असतील.

ड. सभासद :- संस्थेचे नियम व नियमावली मान्य असणारी व कार्यकारी मंडळाने प्रवेश दिलेली नियमीतपणे वर्गणी भरणारी व्यक्ती संस्थेची सभासद म्हणून संबोधण्यात येईल.

ई. अनुसूची :- या नियमावली सोबत जोडलेल्या स्वतंत्र अशा अनुसूची १,२,६ की ज्या सन १९७१ च्या संस्था नोंदणी महाराष्ट्राचे नियमाप्रमाणे आहेत.

फ. उद्देश :- ज्ञापनपत्रात नमूद केलेले उद्देश की ज्या करता स्थापन करण्यात येत आहे असे उद्देश.

२) कार्यक्षेत्र :-

संपूर्ण महाराष्ट्र भर

३) हिशोबाचे वर्ष :-

या संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर राहिल.

४) सभासदत्व व त्याची नोंदणीची पध्दत :-

कोणताही सभासद करून घेते वेळेस त्याचे वय अठरा वर्षे पुर्ण असावे व त्याने वार्षिक रक्कम रूपये एकहजार फक्त फी भरून सामान्य सभासद होता येईल. तसेच संस्थेने ठरविलेल्या नमून्या प्रमाणेच अर्ज करावे लागतील व कार्यकारी मंडळाने त्या अर्जाचा स्विकार केल्यानंतरच त्याला सभासदत्व मिळू शकेल या बाबत कार्यकारी मंडळाचा निर्णय अंतिम राहिल.

| श्री.कृष्णा पोपटराव भिलारे | श्री.कुणाल कृष्णा भिलारे | सौ. संगीता कृष्णा भिलारे |
|---|---|---|

Deputy Charity Commissioner
Pune

५) सभासदांचे प्रकार :-

सभासदांचे प्रकार खालील प्रमाणे राहतील.

१.आजीव सभासद :- जी व्यक्ती एकदम रूपये पाच हजार एक वर्गणी देईल त्या व्यक्तीस आजीव सभासदत्व देण्यात येईल.

२. सामान्य सभासद :- जी व्यक्ती वार्षिक रूपये एक हजार फक्त देईल त्या व्यक्तीस सामान्य सभासद होता येईल.

३.हितचिंतक सभासद :- संस्थेचे कामकाज व योजनेचे विस्ताराचे दृष्टीने रूपये पाचशे ते पाच हजार पर्यंत वर्गणी देणारी व्यक्ती ही हितचिंतक सभासद होईल.

६) सभासद रद्द होणे :-

पुढील एक किंवा अनेक कारणांनी सभासद रद्द करून संस्थेत सभासद म्हणून राहता येणार नाही.

१. ते जर संस्थेचे व्यवहारात किंवा संस्थेचे कारभारात व्यत्यय किंवा बाधा आणित आहे असे वर्तन केल्यास वागल्यास.

२. त्यांनी नैतिक गुन्हा केल्यास, किंवा त्यांना शिक्षा झाल्यास.

३. त्यांना शारिरीक, मानसिक दुर्बलता आली किंवा संस्थेचे काम करणेस असमर्थ ठरल्यास.

४. ते मृत्यू पावले, कायमचे अपंगत्व आले तर किंवा त्यांनी संस्थेतील सभासदांचा राजीनामा दिला.

५. संस्थेचे उद्देशास बाधा आणल्यास किंवा बाधा आणित आहे असे संस्थेचे कार्यकारी मंडळाचे निदर्शनास आल्यास किंवा बाधा आणल्याचा प्रयत्न केल्यास.

६. जर संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सभेत गैरवर्तन केल्यास किंवा संस्थेचे कार्यकारी मंडळाने आयोजित केलेल्या सभेत गैरवर्तनाबद्दल बहुमताने ठराव केल्यास किंवा रद्द ठरविल्यास.

७) सर्वसाधारण सभा व तिची कार्य आणि अधिकार :-

या संस्थेची सर्व साधारण सभा ही दर वर्षी एकदा घेण्यात येईल. या सभेत पुढील प्रमाणे कामे केली जातील.

१. मागील सभेचे इतीवृत्त वाचून दाखविणे.

२. अध्यक्षाच्या सूचनेवरून इतर कामकाज करणे.

३. मागील सभेत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे.

४. संस्थेला आलेल्या देणग्यांचा व वर्गणीचा हिशोब ठेवणे त्यांच्या पावत्या देणे.

५.सर्वसाधारण सभा बोलावून, निवडणुक घेणे.

८) सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :-

सर्वसाधारण सभेची सूचना सभेच्या दिनांकापूर्वी पंधरा दिवस अगोदर नोटीस बोर्डवर लावली पाहिजे. अथवा सभासदांच्या घरी सभेपूर्वी चार दिवस अगोदर गेली पाहिजे. या सूचनेत विषय, सभेचे ठिकाण, तारीख इ. चा उल्लेख करणे आवश्यक आहे.

१ श्री.कृष्णा पोपटराव भिलारे | २ श्री.कुणाल कृष्णा भिलारे | ३ सौ. संगीता कृष्णा भिलारे

Deputy Charity Commissioner Pune

सभेची गणसंख्या एकूण सभासदांच्या तीन पंचमांश इतकी राहिल. ठरलेल्या वेळेत गणपूर्ती झाली नसल्यास सभा त्याच ठिकाणी, त्याच विषयावर अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता नाही. त्यामुळे सभा वैध ठरणेत येईल.

९) विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्य :-

कारणा व्यतिरिक्त कार्यकारी मंडळ अशी सभा बोलावू शकतील. कमीत कमी २/३ सभासदांच्या लेखी मागणीवरून तातडीच्या किंवा विशिष्ट कामासाठी सभा घेण्यात येईल. अशा सभेचे मागणीत कारण विषयाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.या सभेचा निर्णय परिपत्रकान्वये ठरविता येईल. असा निर्णय बिनविरोध झाला पाहिजे. अशा परिपत्रकास विरोध केला गेला तर तो विषय नियमित सभेत चर्चेला घेवून त्यावर बहुमताने निर्णय घेतला जाईल.

१०) संस्थेचे कार्यकारी मंडळ व तिचे पदाधिकारी यांची रचना :-

या संस्थेचे व्यवस्थेचा व योग्य व्यवस्थापनाच्या कारभाराचे हिताचे दृष्टीने सुरळीत व व्यवस्थित कारभाराचे कार्य पद्धतीसाठी संस्थेच्या उपस्थित सामान्य सभासदांकडून दर पाच वर्षांनी कार्यकारी मंडळाची निवडणूक पद्धतीने निवड, वार्षिक सर्वसाधारण सभे मध्ये करण्यात येईल. कार्यकारी मंडळ कमीत कमी सात लोकांचे राहिल. व जास्तीत जास्त पंधरा लोकांचे राहिल.

तिचे पदाधिकारी

१.अध्यक्ष, २.उपाध्यक्ष, ३.सेक्रेटरी, ४.खजिनदार, ५.सभासद असे पदाधिकारी राहतील.

११) कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणूकीची पद्धत :-

कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ पाच वर्षापर्यन्त राहिल. कार्यकारी मंडळाची निवडणूक पाच वर्षांनी होऊन तिचे मतदान गुप्त पद्धतीने घेवून मंडळ स्थापन करता येईल.

१२) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-

या संस्थेचे कार्यकारी मंडळ त्यांचेतून दर पाच वर्षांने वरील पदाधिकारी यांची बहुमताने निवड करतील व त्यांचे कार्य व अधिकार पुढील प्रमाणे राहतील.

१.अध्यक्ष :- सदर संस्थेच्या ध्येय व उदिष्टये यांसाठी प्रयत्न करणे. संस्थेचे व्यवस्थेकरीता प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान स्विकारतील. व्यवस्थेचे कारभाराची व सध्या अस्तित्वात असलेले किंवा नवीन निर्माण झालेल्या मालमत्तेची व्यवस्था पाहणे, देखरेख करणे इ. संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सभेत झालेल्या ठरावाप्रमाणे काम करणे.

२. उपाध्यक्ष :- संस्थेच्या कामा मध्ये अध्यक्ष यांना मदत करणे, त्यांच्या गैरहजेरी मध्ये काम पाहणे.

३. सेक्रेटरी :- प्रत्येक सभेच्या सूचना काढणे, वृत्तांत लिहिणे, ऑफिस रेकॉर्ड ठेवणे, पत्रव्यवहार करणे, संस्थेची व्यवस्था व नवीन निर्माण होणारे संस्थेचे दप्तर सर्व कागदपत्र व्यवस्थित ठेवतील तसेच संस्थेच्या कार्यकारणी अंमलात आणतील कार्यवाही करतील, तसेच प्रमुख व्यवस्थापन मंडळाने स्मरणात आणून त्यांचेशी बोलणी करून विषयावर सभा बोलावतील. संस्थेचे व्यवस्थेकरीता निधी गोळा करून त्यांच्या पावत्या देणे, निरनिराळया मंडळाचे बैठकीत

श्री.कृष्णा पोपटराव भिलारे | श्री.कुणाल कृष्णा भिलारे | सौ. संगीता कृष्णा भिलारे

सादर करणे, त्यास मंजूरी घेणे. पत्रव्यवहार करणे, तक्रारीचे निवारण करणे, संस्थेचे सुरक्षितेचे दृष्टीने आवश्यक ती कोर्ट कचेरीची कामे करणे, त्याचा निर्णय विचार विनिमय कार्यकारी मंडळाचे सभेत मांडणे इ. कामे करणे.

Deputy Charity Commissioner Pune

४.खजिनदार :- खजिनदार यांनी सर्व हिशोब ठेवणे , करणे कामी मदत करणे. संस्थेच्या कोणत्याही कार्यक्रमाचे नियोजन करणे व सहकार्य करणे.

५. सभासद :- संस्थेमध्ये कार्यकारी मंडळाची सल्लामसलत करून संस्थेमध्ये कार्यपध्दतीवर नियंत्रण ठेवणे संस्थेच्या विकासास हातभर लावणे.संस्थेच्या कार्यक्रमावर नियोजन ठेवणे व एक सुसुत्रता आणणे व समाज विकास साधण्याचा प्रयत्न करणे.

१३) कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा:-

कार्यकारी मंडळाची सभा प्रत्येक तीन महिन्यातून एक सभा बोलावली जाईल. त्या सभेला नियमित सभा समजणेत येईल. परंतु कारणा व्यतिरिक्त कार्यकारी मंडळ, ज्यादा सभा बोलावू शकतील. या सभेस विशेष सभा समजली जाईल. कमीत कमी तीन व्यक्तीच्या लेखी मागणीवरून तातडीच्या किंवा विशिष्ट कामासाठी सभा घेण्यात येईल. परंतु अशा सभेचे मागणीत कारण विषयाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.,

१४) कार्यकारी मंडळाचे सभेची सूचना व गणसंख्या :-

कार्यकारी मंडळाची सभेची पूर्व सूचना कमीत कमी सात दिवस आधी द्यावी .अशा स्वरूपाची सूचना सर्वांना देणे आवश्यक राहिल. या सूचनेत विषय, सभेचे ठिकाण, वेळ, तारखेचा उल्लेख करणे आवश्यक राहिल. ठरलेल्या वेळेत तीन पंचमांश गणसंख्या पूर्ती झाली नाही तर ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासापर्यन्त गणपूर्ती न झाल्यास निश्चित दिवशी व वेळी सभा पुढे घेण्यात येईल.त्यावेळी तीन पंचमांश गणपूर्तीची आवश्यकता नाही.

१५) कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम :-

कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ पाच वर्षापर्यंत राहिल. निवडणूक दर पाच वर्षाने होऊन तिचे मतदान गुप्त पध्दतीने घेऊन मंडळ स्थापन करू.

१६) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :-

मृत्यू, राजीनामा अगर अन्य कारणाने रिकामे झालेल्या जागी व्यवस्थापकीय मंडळाचे बहुमताने नवीन पदाधिकारी यांची निवड करतील मात्र सहा महिन्याचे आत नवीन व्यवस्थापकाची

१ श्री.कृष्णा पोपटराव भिलारे | २ श्री.कुणाल कृष्णा भिलारे | ३ सौ. संगीता कृष्णा भिलारे

नेमणूक न झाल्यास मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे यांचे कार्यालयातून योग्य मार्गदर्शन घेवून नवीन पदाधिकारी नेमण्याचे अधिकार संस्थेचे कार्यकारी मंडळास राहिल.

१७) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :-

उद्देश पूर्तीसाठी करावी लागणारी कामे करणे व संस्थेच्या इतर नोकर वर्गाकडून ती करवून घेणे, निधी, देणग्या, वर्गण्या गोळा करणे, त्यांच्या पावत्या देणे, त्याचा विनियोग योग्य पद्दतीने करणे,ध्येय धोरण उद्देश साध्य करणेसाठी निरनिराळया योजना आखणे, संस्थेच्या नियमात बदल सूचविणे, उद्देश पूर्तीचे अगर संस्थेचे हितास बाधा आणण्याकडे लक्ष पुरविणे इ. कामे करणे त्या अंमलात येतील असे पाहणे.

१८) संस्थेचा निधी मिळकत व विनियोग :-

संस्थेच्या नियमाप्रमाणे निधी गोळा करून त्याचा विनियोग समाज कार्याकरता केला जाईल.

१९) उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतूद ( टक्केवारी प्रमाणे ):-

संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी संस्थेच्या ऐकूण उत्पन्नातुन उदिष्ट निहाय खर्चाची तरतुद पुढील प्रमाणे राहिल. व्यवस्थापनासाठी २० टक्के व सामाजिक उद्दीष्टांसाठी ८० टक्के खर्चाची तरतूद राहिल.

२०) कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद :-

संस्थेस कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येईल. मात्र त्यापुर्वी मुं.सा.वि.व्य. १९५० चे कलम ३६ व ३५ प्रमाणे मे. धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांची रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच ठेवी अथवा बिनव्याजी ठेवी स्विकारता येतील.

२१) स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे बाबतची तरतूद :-

संस्थेस योग्य वाटल्यास मिळकत खरेदी करता येईल. मात्र स्थावर मिळकतीची विक्री करायची असल्यास अथवा गहाण, तबदिल करायची असल्यास मुं.सा.वि.व्य. १९५० चे कलम ३६ अन्वये मे. धर्मादाय सह आयुक्त, यांची रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे.

२२) बँक खाते :-

संस्थेच्या कारभाराचे दैनदिन हिशोब, व्यवहार बँकेमार्फत केला जाईल. तेव्हा कोणत्याही बँकेत संस्थेच्या नावे खाते उघडून बँकेमध्ये संस्थेच्या ठेवी, वर्गणी, देणगी इ. रकमा ठेवून त्या काढण्याचा अधिकार फक्त अध्यक्ष, खजिनदार, सेक्रेटरी यांच्या पैकी दोघांच्या सहीने करण्याचा आहे.

२३) सभासदांची यादी ठेवण्याची पद्दत :-

सन १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र ) नियमामध्ये उल्लेख केलेली अनुसूची १, ६ चे स्वतंत्र नमूने अर्जदाराचे सहिनीशी असावे त्याबाबत नियमावलीची तरतूद केलेली असावी.

श्री.कृष्णा पोपटराव भिलारे | श्री.कुणाल कृष्णा भिलारे | सौ. संगीता कृष्णा भिलारे

Deputy Charity Commissioner Pune

सभासदांची यादी १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ प्रमाणे जे संस्थेचे सभासद असतील , त्यांची एक यादी १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र ) नियमातील नियम क्र. १५ अन्वये अनुसूची ६ चे नियमात ठेवण्यात येईल.

२४) नियम व नियमावलीतील बदल करण्याची तरतूद :-

कार्यकारी मंडळाने अगर सभासदांनी चालू नियम व नियमावली मध्ये दुरूस्ती सुचविली असेल तर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या तीन पंचमांश बहुमताने मंजूर करण्यात येईल. मात्र घटना दुरूस्ती मसुदा प्रत्येक सभासदाला नोटीसी बरोबर पाठविला जाईल.

२५) संस्थेच्या नावांत व उद्देशात बदल करण्याबाबतीत तरतूद :-

संस्थेचे नांव किंवा उद्देश यात बदल करावयाचा असे अथवा दोन अधिक संस्थेचे विलीनीकरण करावयाचे असल्यास १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १२ अथवा १२ अ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२६) विसर्जन :-

संस्थेचे विर्सजन करावयाचे असल्यास १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १३ व १४ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

* दा ख ला *

प्रमाणित करण्यात येते की, '' ज्ञानदिप शिक्षण संस्था '' या संस्थेचा नियम व नियमावलीची सत्य प्रत आहे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी |
|---|---|---|
| श्री.कृष्णा पोपटराव भिलारे | श्री.कुणाल कृष्णा भिलारे | सौ. संगीता कृष्णा भिलारे |

Deputy Charity Commissioner * Pune *

खरी नक्कल